INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.828 (SJIF 2022)

# कवी परमानंदाच्या दृष्टीकोनातून आई जिजाऊ

# (Mother Jijau from the point of view of Poet Parmananda)

**डॉ. मोहन काळकुटे**
(इतिहास विभाग प्रमुख)
महिला कला महाविद्यालय, बीड

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/03.2022-69815828/IRJHIS2203009

**प्रस्तावना :**

आई जिजाऊ ! नावासारखे नाव निश्चित नाही या नावात आपल्याला एक नव चैतन्य दिसून येते. 400 वर्षाहून अधिक वर्ष झाली तर महाराष्ट्रात या नावाचा विसर पडलेत दिसून येत नाही. जिजाऊचे सारे जीवन एक उत्तम आदर्श होते. मुलगी, पत्नी, सुन, आई अशा स्त्री सुलभ गुणांनी युक्त त्यांचे व्यक्तीमत्व तर होतेच पण रणांगणावरील लढवय्यी वृत्ती, शस्त्रास्त्रे कौशल्या आणि अशी काही मानसिकता त्यांचेकडे होती की भल्या-भल्यांना त्यांच्या समोर नतमस्तक व्हावे असे वाटते.

**1) उदिष्ट :** कवी परमानंद यांनी आई जिजाऊ केलल्या वर्णनाचा अभ्यास करणे.

**2) विषयाची व्याप्ती :** या शोध निबंधाची व्यक्ती (12 जानेवारी 1598 ते 17 जून 1674) या कालखंडापुरतीच मर्यादित राहील.

**3) संशोधन पध्दती :** या शोध निबंधाचा विषय पुनर्रालोकन व पुर्नविश्लेषणात्मक असल्याने या शोधन निबंध लेखनासाठी विश्लेषणात्मक पध्दतीचा वापर केला आहे.

जिजाऊचे समकालीन कवी परमानंदाने 'शिवभारत' नावाचा संस्कृत ग्रंथ लिहिला त्यात त्यांनी जिजाऊच्या अष्टपैलू गुणाकार काव्य केले आहे. 'कुल कन्या कुले धन्या', 'कुलस्त्री कुल देवता' असे संबोधून त्यांच्या रुपाचे ही वर्णन कवि परमानंद करतात. शहाजीराजांची आवडती राणी म्हणून त्यांचे रुप अतिशय सुंदर होते. शील संपन्नता अशी की 'महासाध्वी' हे विशेषण त्यांच्यासाठी कवि परमानंदाने वापरले आहे. सासूबाई उमाबाई यांची सेवा करण्यात त्या नेहमी तत्पर होत्या. शिवरायाबद्दल तर अतिशय उत्कृष्ट

वात्सल्यभाव त्यांच्या कृतीतून ओसंडत होता. त्या 'निरवधिक गुणा' म्हणजे ' अमर्याद गुणांनी युक्त' होत्या असे कवी म्हणतात.

जिजाऊचे डोहाळे जगा वेगळे होते. डोहाळे म्हणजे गर्भवती स्त्री आणि उदरातील गर्भ या दोघांच्या हृदयातील इच्छा. जिजाऊ आणि शिवरायांच्या मनातील उत्कृष्ट इच्छा परमानंदाने रचलेल्या जिजाऊच्या डोहाळयांच्या वर्णनातून दिसून येते. शिवरायांचे जन्माच्या वेळी जिजाऊंच्या डोहाळयांच्या वर्णनातून दिसून येते. शिवरायांचे जन्माच्या वेळी जिजाऊच्या डोहाळयांच्या वर्णनातून दिसून येते. शिवरायांचे जन्माच्या वेळी जिजाऊना लागलेल्या डोहाळयाचे जे वर्णन कवीने केले आहे ते महत्तवाचे वाटते. काय होते बरे जिजाऊंचे डोहाळे? पर्वतावर चढून हत्तीच्या पाठीवर बसावे, वाघांच्या पाठीवर बसावे, सोनाच्या सिहासनांवर स्थिरपणे आसीन व्हावे, डोक्यावर शुभ्र छत्र छरले जावे, ध्वज उंच फडकावा, सुंदर चवऱ्या ढाळल्या जाव्या, नगाऱ्यांचा आवाज ऐकावा, युध्दावर जावे, घोडयावर मांड ठोकावी, धनुष्य बाण, खड्गधारण करावे, किल्ले जिकून घ्यावेत.विजयश्री खेचून आणावी, मोठ मोठी दाने दयावीत. स्वराज्याची स्थापना करावी असे डोहाळे जिजाऊना लागले होते.

कवी परमानंदाचे हे वर्णन वाचल्यानंतर आपल्या लक्षात येते की जिजाऊंचे हे डोहाळे म्हणजे लवकर घडणाऱ्या क्रांतीकरक युवप्रवर्तणाची नांदी होती. स्वराज्या बद्दलची सुंदर स्वप्ने होती आणि गुलामीचा खळाळ खळकन तुटून पडण्याचे संकेत होते. या वर्णनाचा पुरावा स्वत: परमानंद देतात.

कवी परमानंद जिजाऊ यांचे वर्णन करतांना पुढे म्हणतात. या यादव राजाची कन्या असलेली शहाजी राजांची महाव्रत्ता पत्नी युध्दरस अनुभवण्यासाठी उत्साहित होवून लढायला तयार झाली आहे. त्या वेळी शिवरायांची ती माता राजगडावर वास्तव्य करुन होती. आपल्या गिरी दुर्गाचे रक्षण करण्यासाठी दक्ष झाली होती. कवी परमानंदाने हे जिजाऊ वर्णन शिवराय पन्हाळागड किल्यात अडकून पडले असतांना जिजाऊंनी जे पाऊल उचलले आणि जे खडेबोल उच्चारसह त्यावरुन आपल्यात त्याची प्रतिती येते एकीकडे शाहिस्तेखाचे विध्वंसकारी आक्रमण आणि दुसरीकडे शिवराय पन्हाळगडावर सिध्दी जोहरशी लढयास गुंतलेले अशा बिकट परिस्थिती जिजाऊनी काय केले त्यांचे कवि परमानंद यांनी वरीलप्रमाणे केले आहे.

गड किल्ल्यांच्या संरक्षणापेक्षा आणखी महत्त्वाची जबाबदारी जिजाऊंनी उचचली होती ती म्हणजे शिवाजीराजांना पन्हाळयाच्या वेढयातून सोडवून आणण्यासाठी सज्ज होण्याची आईचं मन शिवबासाठी कुळवळत होतेच पण स्वराज्याच्या रक्षणासाठी देखील ही बाब अतिशय महत्त्वाची होती त्यासाठी जिजाऊनी नेताजी पालकरांजवळ जो निर्धार बोलू दाखवला, तो की परमानंदानी विस्ताराने नोंदवला आहे. राजमाता जिजाऊ म्हणाल्या, 'युध्दासाठी उत्साह धारण करणाऱ्या माझ्या त्या लाडक्या बहिश्वर प्राणाला म्हणजेच शिवाजीराजांना शत्रूंनी पन्हाळगडावर सर्व बाजूनी अडकवून ठेवले आहे. माझ्या त्या बाळात स्वत: सोडवून आणण्यासाठी मी प्रयत्न करणार आहे. मी आज युध्दामध्ये जोहरचे मस्तक छाटून

आणिन. आता शिवा वाचून एकक्षण ही राहणे अशक्य आहे. त्या स्वाभिमानी सिंहासारख्या माझ्या बाळाला मी ताबडतोब घेऊन येईल. तुम्ही येथे एकगितपणे शत्रू बरोबर युध्दा करा मी स्वत: शत्रू असलेल्या त्या जोहर बरोबर युध्द करीन आई जिजाऊंनी सगळी युध्द आयुधे धारण करुन निघण्याचा निर्धार केला होता. त्यांना युध्दावर प्रत्यक्ष जावे लागले नाही. हि गोष्ट वेगळी पण त्यांनी जी तयारी दाखविली, लढयाची भाषा केली आणि जो आत्मनिर्धार केला तो बघता त्यांच्या करारीपणाचे आणि वीर वृत्तीचे दर्शन साऱ्यांनाच घडले.

कविपरमानंदचा जिजाऊ बाबत संस्कृत श्लोक जिजाऊची महती सांगून जातो.

जिजू : जागर्ति जगतीतले |

मालवर्मात्मज: शाहवर्मा या: पार्थिवोत्तम: |

तस्य भार्या महा साध्वी जिजू: विजयवर्धिनी |

नंदिनी यादवेंद्रस्य जागर्ती जगतीतले ||

या अर्थ असा आहे राजामध्ये श्रेष्ठ असलेले क्षत्रिय मालोजीराजे यांचे पूत्र क्षत्रिय शहाजीराजे यांची पत्नी असलेली महासाध्वी विजय वार्धिनी जिजू ( आई जिजाऊ ) हि यादव राजांची नंदिनी ( आनंद देणारी कन्या ) पृथ्वी तलावर जागृत आहे. या मधील 'जागृत' हा शब्द लक्षात घेण्यासारखा आहे. आपण हे वाक्य बरेचदा ऐकतो. ते देवस्थान जागृत आहे ती, देवी जागृत आहे, तो देव जागृत आहे, जागृत म्हणजे पावणारा, आपल्या इच्छापूर्ण करणारा !! जी कोणती इच्छा तुम्ही तिथे बोलून दाखवाल ती पूर्ण होईल. पण इतिहासात कलाटणी देणाऱ्या जिजाऊ कपोलकल्पित नाहीत. तर जिजाऊंचे विचार व कर्तृत्व इतिहासाच्या पानोपानी आजही जागृत आहेस, जिजाऊंचे विचार जर आपण ऱ्हदयात जपून ठेवले, मनात घोळवले, डोक्यात भिनवले आणि कृतित आणण्याचा प्रयत्न केला तर नक्कीच या आयुष्याचं सोने झाल्याशिवाय राहणार नाही.

प्रसिध्द विचारवंत आणि गाढे अभ्यासक डॉ.अण्णा हरी सांळुखे म्हणतात, जागृती, जागृती आणि जागृती !! जागृती विना जीवनात काहीही साध्य होत नाही. अर्थात जिजाऊंची जागृती हि स्वराज्य स्थापनेच्या ध्यासामुळे डोळसपणे स्वत: हून स्वीकारलेली कर्तव्यदक्ष आणि विजयोन्मुख जागृती होती. या जागृतीमुळे एका गौरवशालील इतिहासाचा पाया घातला गेला स्वाभिमानी स्वप्नांची पेरणी केली गेली आणि एका नव्या समाजरचनेची पायाभरणी झाली. खरोखर, बाईपणाचा बाऊ न करता त्यापलीकडे जाऊन माणूस पणाचा विचार करण्याऱ्या जिजाऊ होत्या जिजाऊ हा एक विचार आहे ! आजही जेव्हा - जेव्हा आपण जिजाऊ चरित्राकडे बघतो तेंव्हा तेंव्हा नव्याने जिजाऊना भेटतो. जीवनातील कितीही मोठया अडचणीत त्यांचे चरित्र बळ देणारे आहे. म्हणून फक्त जिजाऊ जयंती निमित्त जिजाऊ विचारांचा उदो उदो नको तर जिजाऊ विचारांनी भारलेली माणसं आणि मनं कशी तयार होतील यासाठी प्रयत्न करणे आवश्यक

आहे.

**निष्कर्ष :**

1) कवी परमानंद यांचे मते जिजाऊचे व्यक्तीमत्त्व अनेक गुण संपन्न होते.

2) कवी परमानंद यांच्यामते आई जिजाऊना डोहाळे स्वराज्य निर्मितीचे लागले होते.

3) कवी परमानंद यांच्या मते जिजाऊ हि आनंद देणारी कन्या पृथ्वी तलावर जागृत आहे.

4) डॉ.आ.ह. सांळुखे यांच्यामते जिजाऊचे विचार व कर्तृत्व इतिहासाच्या पानोपानी जागृत आहे असे दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

1) डॉ. सांळुखे आ.ह., शिवराय: संकार आणि शिकवण.

2) डॉ. निकम लीना व ॲड मोळक शैलजा,- बुध्दिप्रामाण्यावादी जिजाऊ.

3) दैनिक झुंजार नेता, दि.12 जानेवारी 2018.

4) दैनिक चंपावतीपत्र, दि.12 जानेवारी 2018.

5) दैनिक सकाळ, दि.12 जानेवारी 2019.

6) दैनिक मराठवाडा साथी,दि.12 जानेवारी 2020.

7) दैनिक दिव्य लोकप्रभा, दि.12 जानेवारी 2021.